महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१

e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्रमांकः नाविमं / प.उ.मा. / 1506
नागपूर, दि. 15 / 05 / 2025

प्रति,

मा.संचालक,
माहीती प्रसिध्दी व,
जनसंपर्क कार्यालय,
नागपूर विभाग, नागपूर

विषय :– फेब्रु. / मार्च 2025 मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षेच्या गुणपत्रिका व इतर साहित्य वाटपाबाबत.

संदर्भ :– पत्र क्र.रा.मं. / परीक्षा –2 / 1693, पुणे, दिनांक 14 / 05 / 2025 चे पत्रानूसार.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, फेब्रु. / मार्च 2025 उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षेच्या गुणपत्रिका व इतर साहित्य शुक्रवार दिनांक 16 / 05 / 2025 रोजी संकलन केंद्रावर वाटप करण्यात येणार आहेत. तरी कनिष्ठ महाविद्यालयांनी गुणपत्रिका व इतर साहित्य संकलन केंद्रावरून प्राप्त करून घ्यावे.

सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केद्रांनी बातम्यांचे वेळी तात्काळ विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी. ही विनंती.

आपला विश्वासू

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

**प्रतिलिपी :–**

1) सचिव, राज्य मंडळ, पुणे यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) मा. शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित
3) शिक्षणाधिकारी (माध्य). जिल्हा परिषद, (भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया) यांना कळविण्यात येते की, आपले अधिनस्त सर्व संबंधित उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालय, यांना कळविण्याचे कार्यवाहीस्तव.
4) मा. संपादक, दैनिक भास्कर, सकाळ, महाराष्ट्र टाईम्स, लोकमत, देशोन्नती, लोकसत्ता, तरूण भारत, नवभारत यांना विनंती करण्यात येते आपले वृत्तपत्रातून प्रकटनास विनामूल्य प्रसिध्दी देण्याची कार्यवाही करून सहकार्य करावे ही विनंती.

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

### ।। प्रकटन।।

**विषय : उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या गुणपत्रिका व इतर साहित्य वाटपाबाबत.**

---

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रु.-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपध्दतीनुसार अधिकृत संकेतस्थळांवर सोमवार दिनांक ०५ मे, २०२५ रोजी ऑनलाईन जाहीर करण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने फेब्रु.-मार्च २०२५ मध्ये झालेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेच्या गुणपत्रिका,स्थलांतर प्रमाणपत्र व तपशिलवार गुण दर्शविणारे शालेय अभिलेख यांचे वाटप संबंधीत विभागीय मंडळांमार्फत सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांना **शुक्रवार दि.१६/०५/२०२५** रोजी **सकाळी ११.००** वाजता करण्यात येणार असून उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता विद्यार्थ्यांना गुणपत्रिकांचे वाटप करण्यात येणार आहे. याबाबत विभागीय मंडळांमार्फत सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करण्यात आलेले आहे.

यासंदर्भात विभागीय मंडळ कार्यकक्षेतील सर्व संबंधित प्राचार्य /विद्यार्थी व पालक यांनी नोंद घ्यावी.

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४.

दिनांक:-१४/०५/२०२५